المطوية :- من هو عدوالانسان ؟

الكاتب :- محمد فاروق برزک

مراجعه وتصحيح: دكتور سفيان قاضى

मानवतेचा शत्रू कोण असू शकतो ?

लेखक

मोहम्मद फारुक हुर्जूक

संदर्भ

डॉ. सुफयान काझी

" उपजीविका "ची काळजी करु नका उपजीविका प्रदान करणे हि अल्लाह ची जबाबदारी आहे.

" परलोकातील " जीवनाची काळजी करा ही तुमची जबाबदारी आहे .

वरील दोन्ही चित्रांमध्ये सुज्ञ लोकांसाठी चीन्नांसह विचार करण्याचे निमंत्रण आहे की, या जगातील जीवनात पोटाची भूक मिटविण्यासाठी शरीराचा चुराडा करून उपजीविका मिळवितात. आणि सुखी जीवनाचा लाभ घेण्याची इच्छा बाळगत आहेत. नि: संशय उपजीविका मिळविणे अत्यंत गरजेचे आहे, याला मुळीच विरोध नाही. कारण केवळ मानवी शरीराचे शक्तीसाठी नव्हे तर माणुस जीवीत राहण्यासाठी अन्नाचे वापर करणे अनिवार्य आहे. परंतु प्रत्येक जीवाला मृत्यूचा स्वाद चाखावा लागणारच आहे. मग आपल्या पालनकर्त्या अल्लाह जवळ (समक्ष) हाजर होणे आवश्यक आहे यात मुळीच शंका नाही. या वासत्वाचे वर्णन कुरआण मध्ये अल्लाहने असे केले आहे.

[" प्रत्येक जीव मृत्यूची चव चाखणार आहे. मग शवटी सर्वांना आमच्या (अल्लाह) कडेच परत आणले जाईल."] (कुरआण- 29: 57)

लोकांमध्ये असंख्य असे आहेत जे मृत्यूनंतरच्या जीवनाला फेटाळून लावतात किंवा विसरून जातात. तर प्रश्न निर्माण होतो की याचे कारण काय? आणि मनुष्याचा खरा शत्रू कोण असू शकतो? हे दोन विचार करण्याचे गंभीर विषय आहे. आणि मानवाला सावध करणारे प्रश्न आहेत पण या प्रश्नांचे उत्तर देखील तुमच्या पालनकर्त्या अल्लाहने दिले आणि त्यानेच हे विश्वाचे निर्माण केले, त्यानेच मनुष्य व जीनांना निर्माण केले आणि मनुष्यला मानवाच्या शत्रूची जाणीव करून दिली की, तो सैतान मानवाचा शत्रू आहे जो लोकांच्या मनात वादविवाद (भाडन-तंट्ट) निर्माण करण्यासाठी आणि अल्लाहच्या विरोधात उद्धवतो म्हणून त्या दोघांसाठी (मानव आणि सैतान) शाश्वत जीवनाचे वचन निश्चित केले. आणि आपल्या (अल्लाहच्या) वचनाचे व कृपेचा उल्लेख कुरआण मध्ये असे स्पष्ट केले.

[" हे लोकांनो ! अल्लाह चे (पुनरुत्थाना विषयी) वचन अगदी खरे आहे. तर या ऐहिक जीवनाद्वारे तुम्हाला (सैतान)धोक्यात ना टाकावे. आणि असेही व्हायला नको की, तो धोकेबाज सैतान तुमची (अल्लाहच्या बाबतीत) फसवणूक करण्यात

यशस्वी ठरेल. यात मुळीच शंका नाही. की, सैतान तुमचा (लोकांचा) केवळ शत्रू (आणि उघड शत्रूच) आहे. तर तुम्ही त्याला आपला (केवळ) शत्रूच समजा. तो आपल्या अनुयायांना यासाठी बोलवित असतो की, त्यांनीं धगधगत्या आगीचे रहिवासी बनावे. जे लोक सत्य नाकारण्यावर आग्रही राहतील, त्यांच्या साठी कठोर शिक्षा (अटळ) आहे . आणि ज्या लोकांनी श्रध्दा धारण करून सत्कर्मे केली, त्यांच्या साठी क्षमा व फार मोठे बक्षीस (स्वर्ग) आहे."(कुरआण- ३५:५,६,७)

[" सैतान हा मनुष्यविरुद्ध उघड (पेटून उटलेला) शत्रू आहे."] (कुरआण- १२: ५)

अर्थात सैतान सुरवातीपासून (शाशवतपर्यंत) शत्रू ठरलेलाच आहे, तो माणसाच्या हृदयात गुप्त आवाजाने असत्य रुपात अनेक प्रकारचे मॉबूद (उपास्य) चे मार्ग निर्माण करुन देतो, किंवा अल्लाह व मृत्यूनंतर जीवनाचा नकार करुन देतो. हे त्याच्या हेतूचा पहिला उद्देश आहे, जेणेकरुन लोकांची फसवणूक व भरकटवित असतो आणि त्यांच्या मध्ये मत्सर व द्वेष निर्माण करण्यासाठी नेहमीच प्रयत्न करीत असतो.

"हजरत अबू हूरैरा (रजिअल्ला) म्हणतात की अल्लाह चे प्रेषित मुहम्मद (सल्लल्लाहू अलैहि व सल्लम) ला असे म्हणताना ऐकले की,

{" जग शापित आहे. आणि अल्लाह चे स्मरण व अल्लाहला आवडते विद्वान आणि अभ्यासक यांच्या शिवाय जगातील प्रत्येक गोष्ट शापित आहे."} (तिर्मिजी 2322)

अर्थात अल्लाहच्या स्मरणापासून लक्ष विचलित करणारे हे जग आणि या जगातील सर्व वस्तू अल्लाहच्या दृष्टीने शापित आहेत.आणि धनसंपत्ती व संतती तर या वस्तू जगाच्या जीवनाची शोभा तात्पूरती आहे. पण तुमच्या पालनकर्त्याच्या नजरेत ती सत्कर्मे अधिक उत्तम आहेत, ज्यांचा मोबदला चिरकाल टिकनारा आहे. आणि तुमच्या भविष्यासाठी अल्लाह तर्फे बक्षीस आणि चांगल्या अपेक्षांचा स्रोत अधिक चांगला आहे.

बंधूनो ! कुरआण व हदीसच्या माहिती नुसार अल्लाहचे वचन (म्हणजे मृत्यू आणि पुनरुत्थाना विषयी) अगदी खरे व नेहमीसाठी आहे, सैतान मानवाचा उघड शत्रू आहे तो लोकांना धोका देण्यासाठी त्यांच्या हृदयात गुप्त आवाजाने (प्रत्येक गोष्टी विषयी) शंका निर्माण करतो. तो माणसा समोर जगाचे प्रत्येक वस्तू सुंदर पद्धतीने सादर करीत असतो. की मनुष्य मृत्यू नंतर पुन्हा पशुच्या रुपात जन्म घेतो हे सैतानची फसवणूक आणि धोका आहे, अल्लाह सत्य ईश्वर आहे, माणसाला मृत्यू येणे हे ही सत्य आहे तरीही सैतान माणसाच्या हृदयात गुप्त आवाजाने म्हणतो की,

[" सत्याचा (कधीही) स्वीकार करु नकोस "] (कुरआण- ५९:१६)

अशा प्रकारे सैतान धोका देतो. परंतु ज्या पालनकर्त्या (अल्लाह) ने या सृष्टीची आणि मानव व जीनांनची निर्मिती केली, त्यानेच प्रेषित मुहम्मद (सल्लल्लाहू अलैहि व सल्लम) च्याद्वारे कुरआण अवतरीत करुन स्पष्ट केले की, मृत्यूनंतर प्रत्येक व्यक्तीचा हिशोब घेऊन पुण्यची (चांगले) कामे करणाऱ्यांना स्वर्ग दिले जाईल आणि अल्लाहचा सहभागी(शिर्क) ठरवून आणि वाईट कामे करणाऱ्यांना नरकाच्या अग्नीची कठोर शिक्षा-यातना दिली जाईल. आणि तो सैतान इच्छितो की, आपल्या अनुयायांना अल्लाहच्या विरोधात वाईट कामे करून नरकाच्या अग्नी कडे घेऊन जावे. म्हणून आपण स्वतः कुरआण व पैगम्बर मुहम्मद (सल्ललाहू अलैहि व सल्लम) आणि इस्लाम धर्म विरुध्द आणि आपल्या दोन समाजात अत्याचार, अन्याय आणि वादविवाद (दंगा-मस्ती) निर्माण करून सैतानाचे अनुयायी बनू नये, याच्या विरुद्ध स्वतः ची व कुटुंबियांची काळजी घ्यावी.

[" नि: संश्य हा (कुरआण) एक उपदेश (प्रत्येक व्यक्तीसाठी) आहे तर (ज्याचे मन इच्छेल) त्याने आपल्या पालनकर्त्याचा मार्ग स्विकार करावा "] (कुरआण- 76: 29)

यासाठी पवित्र कुरआणचा अभ्यास करून अल्लाह च्या स्मरणापासून आपल्या हृदयात शांति प्राप्त करावे आणि पुनरुत्थानाच्या संकटातून मुक्ती मिळवा ही नम्र विनंती.

आपले हितचिंतूक
फारुक हुर्जूक

धन्यवाद !